पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नागरी सुविधा केंद्र,
क्र. नासुके/३/कावि/ ३९ /२०१६
दिनांक - २२ /०७ /२०१६

**विषय :- लोकशाही दिनात सादर झालेल्या तक्रार अर्जांना निश्चितपणे उत्तर देण्याबाबत...**

**परिपत्रक,**

महाराष्ट्र शासनाकडील परिपत्रक क्रमांक प्रसुधा-२०११/प्र.क्र.१८९/११/१८-अ दिनांक २६.०९.२०१२ अन्वये प्रत्येक महिन्याचे पहिल्या सोमवारी महानगरपालिका स्तरावर लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते तसेच दुसऱ्या सोमवारी विभागीय स्तरावर लोकशाही दिनाचे आयोजन मा. विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत करण्यात येते.

महाराष्ट्र शासनाकडील परिपरत्रक क्रमांक मलोदि१०१६/प्र.क्र.४७/२०१६/लो.दि.कक्ष दिनांक १८/०७/२०१६ अन्वये लोकशाही दिनात नागरिकांकडून सादर होणाऱ्यां तक्रारींना महानगरपालिका अधिकाऱ्यांनी लोकशाही दिनानंतर शक्य तितक्या लवकर ३० दिवसाच्या आत अर्जदाराला निश्चितपणे उत्तर देणे बंधनकारक राहील असे आदेश दिले आहेत.

सबब, महानगरपालिका / विभागीय लोकशाही दिनात सादर होणाऱ्यां तक्रारींना संबंधीत अधिकाऱ्यांनी लोकशाही दिनानंतर शक्य तितक्या लवकर ३० दिवसाच्या आत अर्जदाराला निश्चितपणे उत्तर देणे बंधनकारक राहील. विहित मुदतीत अर्जदाराला उत्तर न दिल्यास संबंधितांवर प्रशासकीय कारवाई करण्यात येईल.याची सर्व विभागप्रमुखांनी नोंद घ्यावी.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११०१८.

प्रति,

विभाग प्रमुख/शाखा प्रमुख
सर्व विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

क्षेत्रिय स्तरावरील (तालुका, जिल्हा / महानगर पालिका, विभागीय) लोकशाही दिनात सादर झालेल्या तक्रार अर्जांना निश्चितपणे उत्तर देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्र. मंलोदि १०१६/प्र.क्र.४७/२०१६/लो.दि.कक्ष
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- १८ जून, २०१६

संदर्भ: १) शासन परिपत्रक क्र.प्रसुधा-२०११/प्र.क्र.१८९/११/१८-अ, दिनांक २६.०९.२०१२

परिपत्रक

उपरोक्त संदर्भाधीन परिपत्रकान्वये विविध स्तरावरील लोकशाही दिन राबविण्याबाबत शासनाचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार सर्व क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी (तालुका, जिल्हा/ महानगर पालिका, विभागीय) अर्जदाराला अंतिम उत्तर लोकशाही दिनानंतर शक्य तितक्या लवकर (एक महिन्याच्या आत) देणे आवश्यक आहे. तथापि मंत्रालय स्तरावरील लोकशाही दिनासाठी प्राप्त होणाऱ्या अर्जांचे अवलोकन केले असता, बऱ्याच अर्जांमध्ये तालुका, जिल्हा/ महानगर पालिका, विभागीय स्तरावर झालेल्या लोकशाही दिनामध्ये क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी अर्जदाराला उत्तर दिले नसल्याचे अर्जदारांनी अर्जासोबतच्या विवरणपत्रात नमूद केल्याचे दिसून येते. क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी अर्जदारास उत्तर न दिल्यामुळे त्यांचा अर्ज मंत्रालय स्तरावरील लोकशाही दिनात स्वीकृत करता येत नाही. त्यामुळे अर्जदारामध्ये असंतोष निर्माण होतो. यास्तव प्रस्तुत परिपत्रकान्वये याबाबत पुढीलप्रमाणे पुन्हा निर्देश देण्यात येत आहेत.

२. **क्षेत्रिय स्तरावरील लोकशाही दिनात सादर झालेल्या तक्रार अर्जांना निश्चितपणे उत्तर देण्याबाबत :-**

क्षेत्रिय स्तरावरील (तालुका, जिल्हा/ महानगर पालिका, विभागीय) लोकशाही दिनात सादर झालेल्या तक्रार अर्जांना क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी म्हणजेच तहसिलदार, नगरपालिका, महानगरपालिका अधिकारी, जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त यांनी लोकशाही दिनानंतर शक्य तितक्या लवकर ३० दिवसाच्या आत अर्जदाराला निश्चितपणे उत्तर देणे बंधनकारक राहिल.

३. **लोकशाही दिनाचा आढावा :-**

लोकशाही दिनाचा आढावा घेण्याच्या अनुषंगाने संदर्भाधिन परिपत्रकान्वये आवश्यक सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्याअनुषंगाने पुन्हा कळविण्यात येत आहे की, जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त यांनी लोकशाही दिनाबाबत आढावा घेताना अर्जदारांच्या लोकशाही दिनातील अर्जास विहीत मुदतीत निश्चितपणे उत्तर दिले आहे, याबाबत खात्री करावी. विहित मुदतीत उत्तर दिले नसल्यास संबंधितांस लेखी समज देण्यात यावी.

संगणकीकृत नागरी सुविधा केंद्र
आवक क्र. 517
दिनांक 20/6/16
टेबल क्र. 3
लिपिक
व. लिपिक
प्रशा. अधिकारी
सहा. आयुक्त

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०१६०६१८१७०७४२२३०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dr Prem Singh Meena

Digitally signed by Dr Prem Singh Meena
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Dept., postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b7ea6c0963c6e2968faf5ee62acd8a913dd4de985b56a05084b7de776d9e00bb, cn=Dr Prem Singh Meena
Date: 2016.06.18 17:11:22 +05'30'

(डॉ. पी. एस. मीना)
अपर मुख्य सचिव, (प्र.सु., र. व का.)

प्रति,

१) मा. विरोधी पक्षनेता विधानसभा / विधान परिषद
२) सर्व मा.संसद सदस्य / विधानसभा सदस्य / विधानपरिषद सदस्य
३) मा. राज्यपाल यांचे सचिव,
४) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
५) सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई,
६) मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव,
७) सर्व विभागीय आयुक्त,
८) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई / पोलीस महानिरीक्षक,
९) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
१०) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
११) सचिव, निवडणूक आयोग, मुंबई,
१२) सर्व जिल्हाधिकारी /सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
१३) सर्व मनपा आयुक्त /पोलीस आयुक्त / सर्व पोलीस अधिक्षक
१४) प्रबंधक, मूळ व न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
१५) प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
१६) प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१७) सर्व जिल्हा माहिती अधिकारी
१८) सर्व तहसिलदार
१९) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (यांना प्रसिध्दीसाठी),
२०) ग्रंथालय विधानमंडळ सचिवालय (५ प्रती)
२१) निवड नस्ती/लोकशाही दिन कक्ष.

.............